महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/**DGP-D310300/1/2024-DESK 31** मुंबई, दि.२८/०५/२०२४

विषय:- राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याबबात.

******

**परिपत्रक:-**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनिमय,दि.०१/०३/२०२४ नुसार शासनाने राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरीता विविध प्रयोजनांसाठी सुधारीत कमाल मर्यादा व व्याजदर निश्चित केले आहेत.

२. खालील नमूद घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या आस्थापनेवरील ज्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे अर्ज घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये भरले आहेत. परंतु त्यांना अद्याप घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले नाही. त्यामधील जर काही पोलीस अधिकारी/अंमलदार यांना दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार घरबांधणी अग्रिमाच्या मागणीमध्ये काही बदल करावयाचा असेल तर त्यांनी सॉफ्टवेअरमध्ये भरलेला अर्ज रद्द करुन पुन्हा नव्याने अर्ज भरणे आवश्यक आहे.

३. तसेच काही घटक कार्यालयाकडुन सॉफ्टवेअरमध्ये अर्ज भरताना चूकीची रक्कम नमूद केली जाते. त्यानंतर रक्कम दुरुस्त करण्यातबाबत या कार्यालयास कळविले जाते. तरी सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या आस्थापनेवरील संबंधीत पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अर्जा मध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास प्रथम सॉफ्टवेअरमध्ये भरलेला अर्ज रद्द करुन पुन्हा नव्याने अर्ज भरावा लागणार आहे. त्यामुळे पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे घरबांधणी अग्रिमाचे अर्ज सॉफ्टवेअरमध्ये भरताना अर्जदार यांची संपूर्ण माहिती व त्यांना देय असलेली घरबांधणी अग्रिमाची रक्कम बरोबर आहे किंवा कसे याबाबत खात्री करावी, व त्यानंतरच सॉफ्टवेअरमध्ये अचूक रक्कम/ माहिती भरण्यात यावी. सॉफ्टवेअरमध्ये चुकीची रक्कम/माहिती भरलेल्या संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचा अर्ज रद्द करुन पुन्हा सॉफ्टवेअरमध्ये नव्याने अर्ज भरावा लागेल. **सॉफ्टवेअरमध्ये नव्याने अर्ज भरल्यास नव्याने अर्ज ज्या दिनांकाला भरला जाईल त्या दिनांकास जेष्ठतायादी मध्ये**

**त्याचा जेष्ठताक्रम दिसणार आहे. तरी सर्व घटक प्रमुखांनी सदरची बाब संबंधीत पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या निर्देशनास आणून द्यावी,** व अचूक माहिती सॉफ्टवेअरमध्ये भरण्यात यावी.

४. तरी उपरोक्त नुसार दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती विचारात घेऊन पोलीस अधिकारी/अंमलदार यांना त्यांच्या घरबांधणी अग्रिमाच्या रक्कमेत काही बदल करावयाचा असल्यास खालील विवरणपत्रानुसार माहिती **दि.३१/०५/२०२४** पर्यंत या कार्यालयास पाठवावी. जेणे करुन त्यांचा अर्ज रद्द करणेबाबत सॉफ्टवेअर कंपनीस कळविणे शक्य होईल व अर्ज रद्द केल्यानंतर संबंधीत पोलीस अधिकारी/अंमलदार यांना पुन्हा अर्ज भरणे शक्य होईल. सदरची माहिती या कार्यालास विहीत वेळेत प्राप्त न झाल्यास, उशिरा प्राप्त होणा-या माहितीचा विचार केला जाणार नाही. तसेच यापूर्वी घरबांधणी अग्रिम मंजूर झालेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा नव्याने मागणी करता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांचे मान्यतेने

(डॉ. आरती सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह)(बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/ राज्य राखीव पोलीस बल, मुंबई/ वाहतुक मुंबई/ फोर्सवन मुंबई/ आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, मुंबई/ नागरी हक्क संरक्षण विभाग, मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ बिनतारी संदेश विभाग, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई/ मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान/राज्य राखीव पोलीस बल, नागपूर/पुणे
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक
अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/ पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
सर्व पोलीस अधीक्षक, (गुन्हे/ बिनतांरी सदेश/ लोहमार्ग सह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, (रारापोबल सह )/अ.अ.प्र.के., नागपूर/ UCTC-मुंबई/पुणे
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९/ राज्य अपत्ती प्रतीसाद दल,धुळे/ नागपूर
सर्व अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग

## विवरणपत्र

| अ.क्र. Sr.No. | नाव Name | सेवार्थ आयडी Sevarth ID | अर्ज रद्द करण्याचे कारण Reason for cancel application | शासन निर्णयानुसार नव्याने भरण्यात येणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| **टिपः- सदर विवरणपत्रामधील माहिती इंग्रमीमध्ये पाठवावी.** | | | | |